ग्रामीण कृषि मौसम सेवा

डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला आणि भारत मौसम विभाग

ईमेल – gkmsakola@yahoo.com

अमरावती जिल्हा कृषि हवामान सल्ला पत्रक क्रमांक - ३४ / २०२४ - २०२५ **दिनांक: मंगळवार १९ नोव्हेंबर २०२४**

हवामान घटक	हवामान अंदाज (दिनांक १९ नोव्हेंबर ते २३ नोव्हेंबर २०२४)				
दिनांक	१९/११	२०/११	२१/११	२२/११	२३/११
पाऊस (मिमी)	0	0	0	0	0
कमाल तापमान (अ.से.)	31.3	31.5	31.3	31.4	31.2
किमान तापमान (अ.से.)	14.5	14.2	14.3	14.5	14.3
सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	50	43	37	38	39
दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	27	27	23	20	21
वा-याचा वेग (किमी / तास)	5	5	6	6	5
वा-याची दिशा	49	64	70	78	75
आकाश स्थिती	स्वच्छ	स्वच्छ	स्वच्छ	स्वच्छ	स्वच्छ

पिकांचे नाव	अवस्था	कृषि सल्ला
हवामान अंदाज		• प्रादेशिक हवामान संशोधन केंद्र, नागपूर यांच्या कडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार दिनांक १९-२३ नोव्हेंबर दरम्यान हवामान कोरडे राहील, तसेच पुढील पाच दिवस किमानव कमाल तापमानात काही विशेष बदल होणार नाही.
सामान्य सल्ला		• पिकास आंतरमशागत जसे निंदण करून पिक तण विरीहीत ठेवावे.
कपाशी	फुल पाती / बोंड धारणा	• अगोदर पेरणी केलेले कपाशी पिक वेचणीला आले आहे तरी कापूस वेचतांना प्रतवार व वाण प्रत वेचून त्याची सुकलेल्या सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावे. • कपाशी पिकातील बोंड अवस्थ्येत लाल्या वेवेस्थापनसाठी ०१ टक्के युरिया अधिक ०१ टक्के मेग्नेसिअम सल्फेटची पाण्यात मिसळून फवारणी करावी. • किडक्या बोन्डाची आर्थिक नुकसान पातळी ५ ते १०% असल्यास थायोडीकार्ब २५% डब्ल्यूपी २५ ग्रॅम किंवा क्विनॉलफॉस २५% एएफ २५ मिली किंवा क्लोरपायरीफॉस २५% प्रवाही २५ मि.ली किंवा प्रोफेनोफॉस ५०% ३० मिली किंवा इन्डोक्झाकार्ब १५.% १० मिली या पैकी कोणतेही एक कीटकनाशक १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • जेथे प्रादुर्भाव १० टक्केच्या वर आहे अशा ठिकाणी आवश्यकतेनुसार प्रादुर्भाव पुढे वाढू नये म्हणून पुढील कोणत्याही एका मिश्र कीटकनाशकाची, ट्रायझोफॉस ३५% + डेल्टामेथ्रीन १ टक्के १७ मि.ली किंवा क्लोरान्ट्रोनिलीप्रोल ९.३ टक्के + लेम्बडासायहॅलोथ्रीन ४.५% ५ मिली किंवा क्लोरपायरीफॉस ५० टक्के +सायपरमेथ्रीन ५ टक्के २० मि.ली किंवा इन्डोक्झाकार्ब १४.५ टक्के + ऍसिटामाप्रिड ७.७ टक्के १० मि.ली या पैकी कोणतेही एक मिश्र कीटकनाशक १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
तूर	फुल / शेंग धारणा	• तूर पिकात हेलीकोव्हरपा अळीच्या सर्वेक्षणासाठी ५ कामगंध सापळे प्रती हेक्टरी या प्रमाणे उभारावेत व त्यासोबतच पक्षी थांबे उभारावेत. • सुरवातीच्या काळात येणाऱ्या घाटे अळीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा ३०० पीपीएम अझाडीरेक्टीन प्रती ५० मि.ली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • तूर पिकात ओलिताची सोय असल्यास व गरज पडल्यास पिकास पाणी द्यावे.
तिळ	वाढ	• अर्धरब्बी तीळ पिकात वापसा स्थिती पाहून आंतरमशागतीची कामे म्हणजे डवरणी व निंदन करून पिक ताणविरहित ठेवावी. • तिळ पिकात ओलिताची सोय असल्यास व गरज पडल्यास पिकास पाणी द्यावे.
रब्बी ज्वारी/ मका	वाढ	• पिकात गरज पडल्यास निंदण व डवरणी करून पिक तण विरहित ठेवावे. • ओलिताची सोय असल्यास पिकास पाणी द्यावे, त्यासोबत उर्वरित रासायनिक खताचा नत्राची मात्रा प्रती ४० किलो प्रती हेक्टरी द्यावे.
रब्बी करडी	वाढ	• रब्बी पिकामध्ये करडी पिकात गरज पडल्यास निंदण व डवरणी करून पिक तण विरहित ठेवावे. • करडई पिकाचे धुऱ्याजवळील झाडावर मावा किडीचा प्रादुर्भाव दिसताच फक्त सभोवतालच्या ४ ओळीवर डायमीथोएट ३० टक्के प्रवाही १० मि.ली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. ज्या ठिकाणी पिक ३० दिवसाचे झाले आहे तिथे ओलिताची सोय असल्यास पिकास पाणी द्यावे. • करडई पिकाच्या अधिक उत्पन्नसाठी पिकास सौरक्षित ओलीत देण्याची शिफारस आहे, एक ओलिताची सोय असल्यास पेरणीपासून ५० दिवसांनी, दोन ओलिताची सोय असल्यास पेरणीपासून ३० व ५० दिवसांनी तसेच तीन ओलिताची सोय असल्यास पेरणीपासून ३०, ५० व ६५ दिवसांनी ओलीत द्यावे.
जवस	वाढ	• वेळेवर पेरणी केलेल्या जवस पिकामध्ये आंतरमशागत करावी.
हरभरा	वाढ	• हरभरा पिकास आंतरमशागत जसे निंदण करून पिक तण विरीहीत ठेवावे. • ओलिताची सोय असल्यास पिकास पाणी द्यावे.
गहू	पेरणी	• ओलिताखालील अति उशिरा गहूची पेरणी १५ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर पेरणीसाठी, वाण पीडीकेवी सरदार (एकेएडब्लू ४२१०-६), एकेडब्लू-१०७१(पूर्णा) ची पेरणी करावी. • बियाण्यास कार्बेन्डाझीम प्रती २.५ ग्रम प्रती किलो ची बीज प्रक्रिया पेरणी अगोदर करावी. या वेळी ४० किलो नत्र + ४० किलो स्फुरद + ४० किलो पालाश या प्रमाणे पेरणीच्या वेळेस स्फुरद व पालाशची संपूर्ण मात्रा आणि नत्राची अर्धी मात्रा तसेच १८ ते २० दिवसांनी नत्राची दुसरी मात्रा पहिल्या पाणी देतांना द्यावी.
मोहरी	पेरणी	• ओलिता खालील सलग मोहरीची पेरणी १५ नोव्हेंबरपर्यंत करावी. पुसाबोल्ड जातीचे हेक्टरी ५ किलो बियाणे ४५ सें.मी. अंतरावर पेरावे. या वेळी ५० किलो नत्र + ४० किलो स्फुरद या प्रमाणे पेरणीच्या वेळेस स्फुरदची संपूर्ण मात्रा आणि नत्राची अर्धी मात्रा तसेच २० ते २५ दिवसांनी नत्राची दुसरी मात्रा द्यावी. अधिक उत्पादन वाढीसाठी प्रती हेक्टरी किलो २० गंधक आणि १ किलो बोरॉन पेरणीच्या वेळीच ध्यावे.
फळ पिक	वाढ	• संत्राच्या आंबिया बहराच्या पक्क्व झालेले फळांची योग्य पद्धतीने तोडून प्रतवारी करून विक्री करावी. फळाबागेतील आळे तण विरीहीत ठेवावे. • पेरू व सीताफळ बागेतील फळतोडणी वेळेवर करावी. • निंबू फळाबागेतील हस्त बहाराच्या नियोजनाच्यासाठी पॉटासीअम नायट्रेट २ टक्के वापरावे. सत्रापिकला त्याच्या वयानुसार शिफारस खत द्यावे. • फळ बागेला आवश्क्ते नुसार ओलित करावे.
भाजीपाला	वाढ	• भाजीपाला पिकास त्याच्या गरजे प्रमाणे पाणी द्यावे. • गादीवाफ्यावर कांदा बियाणे (हेक्टरी ८ ते १० किलो) पेरावे.पांढऱ्या जाती : अकोला सफेद, फुले सफेद, यशोदा, भीमा श्वेता, पुसा व्हाईट राउंड, लाल-पुसा रेड, एन २-४-१, निफाड-५३,बसवंत ७८०. • कोथिंबीर (संभार , लसून, मुला, मेथी, पालक, श्रावण घेवडा, बटाटा, गाजर, गवार, वाटणा इ.भाजीपाला पिकांची लागवड करावी.
पशु / जनावरे	--	• सतर्क ईशारा दरम्यान जनावरांची योग्य ती काळजी घ्यावी व त्यांना चरण्यासाठी पाठवू नये व त्यांना जागेवरच खाद्य ध्यावे. • जनावरांना पशुवैदकांचे सल्ल्या नुसार लसीकरण करावे. सतर्क इशारा करिता दामिनी मोबाईल अप चा उपयोग करावा.

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.

नोडल अधिकारी
ग्रामीण कृषि मौसम सेवा, अकोला
डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

संशोधन सहयोगी
ग्रामीण कृषि मौसम सेवा,
डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला